Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंकः १४ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ३ जुलै २०१८ ते सोमवार ९ जुलै २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ छगन भुजबळ हेच घोटाळयाचे सूत्रधार!

अनुदानित आणि विनाअनुदानित सिलेंडरच्या दरात वाढ ४

# कुणी-कुठे आणि कसं मरायचं, डायरीत नोंद
# ११ जणांचा मृत्यू अंधश्रद्धेतून?



**नवी दिल्ली (विशाल कारंडे)- राजधानी दिल्लीतील बुराडी इथं एकाच कुटुंबातील ११ जणांचे मृतदेह लटकलेल्या अवस्थेत मिळाल्याने देशभरात एकच खळबळ उडाली आहे. १ जुलैला हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर आता त्याबाबतची नवनवी माहिती समोर येत आहे.या ११ जणांचा मृत्यू अंधश्रद्धेतून झाल्याची चर्चा आहे. त्याचं कारण म्हणजे घरातून एक रजिस्टर/नोंदवही मिळाली आहे. या नोंदवहीत कोणी कसं मरायचं आणि कोणाची मरणाची जागा कुठे असेल, याबाबतचा उल्लेख आहे. इतकंच नाही तर मृत्यूसाठी स्टूलचा वापर करु, डोळे बंद करु आणि हात बांधले तर आपल्याला मोक्ष मिळेल, असा उल्लेख या वहीत आहे.**

महत्त्वाचं म्हणजे नोंदवहीतील उल्लेखाप्रमाणेच सर्व ११ मृतदेह त्या अवस्थेतच होते.सध्या या सर्व मृतदेहांच्या शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरु आहे. त्याबाबतच्या अहवाल आल्यानंतर मृत्यूचं खरं कारण करेल. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घरातील रजिस्टरमध्ये मोक्ष प्राप्तीचा मार्ग सांगण्यात आला आहे. 'जर तुम्ही स्टूल वापरुन, डोळे बंद करुन आणि हात बांधाला, तर मोक्ष मिळेल'असं या रजिस्टरमध्ये म्हटलं आहे. नोंदवहीतील उल्लेखाप्रमाणेच सर्व ११ मृतदेह स्टूल वापरुन, डोळे बंद करुन आणि हात बांधालेल्या अवस्थेत लटकलेले होते. त्यामुळे पोलिसांनी अंधश्रद्धेच्या अँगलने तपास सुरु केला आहे. सुरुवातील पोलिसांनी सामूहिक आत्महत्या असल्याची शक्यता वर्तवली होती. मात्र रजिस्टर मिळाल्यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा बदलली आहे. या ११ मृतांमध्ये जी वयस्कर महिला आहे, त्यांची दुसरी मुलगी सुजाता हरियाणाच्या पानिपतमध्ये राहते. त्यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी दिलेली माहिती आश्चर्यकारक आहे. हे कुटुंब धार्मिक जरुर होतं, मात्र अंधविश्वासू नव्हतं, असं त्यांनी सांगितलं.आमचं कुटुंब सुशिक्षित आणि आनंदी होतं. आमची कोणावर शंका नाही, असं सुजाता यांनी सांगितलं.मृत्यूमुखी कुटुंबात १७ जूनला साखरपुड्याचा कार्यक्रम झाला होता. या कार्यक्रमात अनेक नातेवाईकही सहभागी झाले होते. या कार्यक्रमात कुटुंबीयांनी धमाल मस्ती केली होती, त्याचे फोटो समोर आले आहेत. जे ११ मृतदेह मिळाले आहेत त्यापैकीच प्रियंकाचा हा साखरपुडा होता.

# धुळे हत्याकांड
## आतापर्यंत २३ जणांना अटक

**धुळे (गौतम कांबळे)- मुले पळवणारी टोळी समजून पाच जणांची हत्या केल्याप्रकरणी आतापर्यंत २३ जणांना अटक करण्यात आली आहे. साक्री तालुक्यातील राईनपाडा या आदिवासी पाड्यावर १ जुलैला, जमावाने मुले पळवणारी टोळी समजून पाच जणांची हत्या केली.**



राईनपाडा हे साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आदिवासी गाव आहे. या गावाच्या आठवडे बाजारात काहीजण फिरत होते. हे फिरणारे लोक मुले पळवणारी टोळी आहे, असा संशय घेऊन १ जुलैला दुपारी त्यांना ग्रामपंचायतीच्या कार्यालयात डांबून मारहाण करण्यात आली. मुलं पळवण्याच्या संशयातून पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राईनपाडा गावात नागरिकांनी ५ जणांना लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांना ग्रामपंचायतच्या खोलीत डांबण्यात आलं. तिथंही त्यांना बेदम मारहाण झाली. यावेळी संपूर्ण खोलीत रक्ताचा सडा पडलेला दिसला. मारहाण झालेले एका कोपऱ्यात विव्हळत असतानाही त्यांच्यावर उपचार करायचे सोडून, जमावाकडून त्यांना मारहाण सुरुच राहिली. आणि त्यातचं या पाचही जणांचा जीव गेला. मृतांपैकी भारत शंकर भोसले, दादाराव शंकर भोसले, भारत शंकर मालवे, अगनू इंगोले हे चौघेजण सोलापुरातील मंगळवेढा येथील राहणारे होते, तर राजू भोसले कर्नाटकमधील राहणारे होते.

१ भारत शंकर भोसले (रा. खावे, मंगळवेढा), २ दादाराव शंकर भोसले (रा. खावे, मंगळवेढा), ३ भारत शंकर मालवे (रा. खावे, मंगळवेढा), ४ अगनू इंगोले - (रा. मानेवाडी, मंगळवेढा),५ राजू भोसले रा. गोंदवून (कर्नाटक) या मारहाणप्रकरणी रविवारी १५ जणांना ताब्यात घेण्यात आले होते.

याप्रकाराने राईनपाडा गावात तणावाचे वातावरण असून, घटनेनंतर रविवारी पोलिस अधीक्षकांसह मोठा पोलिस फौजफाटा गावात दाखल झाला.सोशल मीडियावरील अफवांवर कुणीही विश्वास ठेवू नका, असे आवाहन गृहराज्यमंत्री दीपक केसरकर यांनी केले आहे.

## वेगवेगळ्या २ घटनांत ३ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

**रायगड / लोनावळा (अभिजीत येरल्लु)-** रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील शेत तळ्यात दोन शाळकरी विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कर्जतच्या आंबिवली गावानजीक पेठ रस्त्यावरील शेत तळ्यात पोहायला गेलेल्या अक्षय प्रकाश खेडेकर आणि प्रतीक अशोक पिंपरकर या मुलांचा बुडून मृत्यू झाला. मत्स्य शेतीच्या शेत तळ्यात टाकलेल्या प्लास्टिक मुळे या मुलांना पाण्या बाहेर येता आले नाही आणि त्यामुळेच त्यांचा मृत्यू झाला अशी माहिती समोर आली आहे.दरम्यान, दुसऱ्या घटनेत लोणावळ्याजवळील कामशेत येथील इंद्रायणी नदीच्या बंधाऱ्या जवळ पोहण्यासाठी आलेल्या एका शालेय विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. दोन दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर या विद्यार्थ्यांचा मृतदेह शोधपथकाला रविवारी दुपारी सापडला. प्रथमेश दिपक साळुंखे हा १४ वर्षीय मुलगा शाळेतून परस्पर कामशेत येथिल इंद्रायणी नदीमध्ये पोहण्यासाठी आला होता. पोहत असतानाच तो पाण्यात बुडाला.

## मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघातः २ ठार २ जखमी

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंबई गोवा महामार्गावर दाभिळ नाका इथं झालेल्या भीषण अपघातामध्ये दोन ठार तर दोन जण जखमी झाले आहेत. मालवाहू टँकर आणि कारमध्ये हा अपघात झाला. या अपघातामुळे दोन्ही बाजूची वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. गेल्या काही काळात रस्तेअपघातांची संख्या मोठ्या प्रामाणावर वाढली आहे. त्यामुळे रस्ताप्रवास सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.प्राप्त माहितीनुसार, लोटे औद्योगिक वसाहतीतील हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीतील कार्यक्रम उरकून कंपनीतील चौघे जण मोटार कारने मुंबईच्या



दिशेने निघाले होते. दरम्यान, मुंबई गोवा महामार्गावर दाभिळ नाक्याजवळ त्यांच्या गाडीला अपघात घडला. या अपघातामध्ये कंपनीचे लोटे युनिटचे डायरेक्टर आणि फॅक्ट्री मॅनेजर गिरीष बर्वे हे जागीच ठार झाले तर गंभीर जखमी झालेले कंपनीचे पर्सनल मॅनेजर विशाल म्हातले यांच्यावर चिपळूण येथील लाईफ केअर रुग्णालयात उपचार सुरु असताना त्यांची प्राणज्योत माळवली. दरम्यान, अपघातात जखमी असलेल्या राकेश वडाळकर यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु असून, राजेश जोशी हेही या अपघातामध्ये जखमी झाले आहेत.

## मुख्यमंत्र्यांच्याच कार्यक्रमात प्लास्टिकचे ग्लास
## प्लास्टिकबंदीचे नियम धाब्यावर

**मुंबई (अमोल गुडेकर)-** कल्याण तालुक्यातील वरपा गावात रविवारी वृक्षलागवडीच्या मोहिमेचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. राज्य सरकारने राज्यात प्लास्टिकबंदी लागू केली असताना मुख्यमंत्र्यांच्या या कार्यक्रमातच प्लास्टिकचे ग्लास वापरण्यात आल्याचाप्रकार समोर आला आहे. कार्यक्रमात उपस्थितांना पाणी वाटण्यासाठी बंदी असलेल्या प्लास्टिकच्या ग्लासांचा वापर करण्यात आला. राज्यात २३ जूनपासून प्लास्टिकबंदी लागू करण्यात आली आहे. राज्याचे पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. असे असताना देखील



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्रमात प्लास्टिकबंदींच्या नियमांचे उल्लंघन झाले. खुद्द मुख्यमंत्र्याकडून जर प्लास्टिकबंदीच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर जनतेने काय करायचे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, रायगडचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण उपस्थित होते.

## जम्मू-काश्मीरमध्ये सरकार बनवण्याचा जोरदार प्रयत्न

**नवी दिल्ली (राकेश गायकवाड)-** जम्मू-काश्मीरमध्ये सध्या राज्यपाल शासन लागू आहे. सोमवार देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या घरी काँग्रेसच्या सर्व वरिष्ठ नेत्यांची बैठक सुरु आहे. या बैठकीत मनमोहन सिंग यांच्यासह डॉ. कर्ण सिंह, माजी अर्थमंत्री पी चिदंबरम, राज्यसभेचे काँग्रेसचे नेते गुलाम नबी आजाद आणि



अंबिका सोनी या देखील सहभागी आहेत. काँग्रेसचे हे सर्व नेते यूपीए अध्यक्षा सोनिया गांधी यांनी काश्मीर मुद्द्यावर बनवलेल्या कमिटीचा भाग आहेत. या कमेटीचे चेअरमन डॉ. मनमोहन सिंग आहेत. मनमोहन सिंग यांच्या घरी ११ वाजता ही बैठक होणार असल्याचं सूत्रांचं म्हणणं आहे. या बैठकीत काश्मीरच्या राजकारणावर चर्चा होणार आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सरकार बनवण्याचा देखील विचार होऊ शकतो.जम्मू-काश्मीरमध्ये काही दिवसांपूर्वीच भारतीय जनता पक्षाने महबूबा सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये राज्यपाल शासन लागू करण्यात आलं होतं.

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे राईनपाड्याची पुनरावृत्ती मालेगावमध्ये टळली

**मालेगाव (हर्षद परब)-** राईनपाड्याची घटना अगदी ताजी असताना, मालगेवामध्येही अगदी तसाच प्रकार घडला. पण समजदार नागरिकांच्या प्रसंगावधानानं जीवितहानी टळली.. मालेगावातल्या अली अकबर हॉस्पिटलच्या मागे असलेल्या आझादनगर भागात मुले पळवणारी टोळी समजून चार जणांना जमावाने बेदम मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी चौघांना जमावाच्या तावडीतून सोडविण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, संतप्त जमावाने पोलिसांच्या गाडीची मोडतोड केली. अखेर पोलिसांनी जमावाची समजूत काढून त्यांना शांत करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं. त्यांच्या तावडीत असलेल्या चौघांना ताब्यात घेतले.चौघेही परभणी जिल्ह्यातील असल्याचे समजते.मुलं पळवणारी टोळी गावात आल्याच्या अफवेतून मारहाण करण्याच्या प्रकाराने विकृत रूप धारण केलं.

## सौजन्य व्हॉट्सअप




## सातबाऱ्यावर देवाचं नाव, शेतकरी लाभापासून वंचित

**रत्नागिरी (योगेश होळंब)-** रत्नागिरी जिल्ह्यातील पेढे आणि परशुराम या दोन गावातील हजारो ग्रामस्थ रस्त्यावर उतरली आहेत. ग्रामस्थ मुंबई-गोवा महामार्गावरून चिपळूणच्या प्रांत कार्यालयावर आपला मोर्चा घेऊन निघाली आहेत. या ग्रामस्थांची समस्या ऐकून तुम्हीही विचारात पडाल. पेढे आणि परशुराम या दोन गावातील जमिनीवर १९७० नंतर सरकारने या गावातील परशुराम देवस्थानचं नाव लावलं आणि तेव्हापासूनच या गावांचा विकासच ठप्प झाला, असं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे.प्रत्येक शेतकऱ्याच्या सात बाऱ्यावर शेतकऱ्याच्या नावाबरोबर देवाचं नाव असल्याने इथला शेतकरी



आपल्या जमिनीवर घर बांधू शकत नाही, शिवाय इथे कोणाला बँकेचं कर्जही मिळत नाही. त्यामुळे ग्रामस्थ संतापले आहेत.एवढंच नाही, १९७० नंतर या गावात आलेल्या नुकसानभरपाईचा एकही रुपया या गावातील शेतकऱ्याला मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.या गावात सरकारचे पाच विविध प्रकल्प आले. सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या. मोबदला म्हणून तब्बु २०० कोटी रुपये आले, पण तेही सरकार दरबारीच राहिले. ते अजूनही मिळाले नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. या गावाची जमीन मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणासाठी जात आहे. पण याचाही ४० कोटींचा मोबदला या शेतकऱ्यांना मिळणार नाही. शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर देवाचं नाव लावल्यामुळे ही अडचण आहे.सरकारने आता तरी आम्हाला या जोखडातून मुक्त करावं यासाठी हा आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे.

## पुण्यात बस पुलावरुन खाली कोसळली, १० जण गंभीर

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** पीएमपीएलची बस पुलावरुन कोसळल्याची घटना पुण्यात घडली आहे. या घटनेत दहा जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. कात्रजहून निगडी आणि वाकडकडे जाणाऱ्या बसला हा अपघात झाला.वाकडकडे जाणारी बस वारजे-कात्रज बाह्यवळण मार्गावर उड्डाणपुलालगत ओढ्यात कोसळली. ओढ्यालगत उड्डाणपुलाचं काम सुरू आहे. त्या ठिकाणी राहण्याची सोय करण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडवर ही बस कोसळली. बसमधील काही प्रवासी तसेच शेडकार्डमधील दोन



नागरिकांना उपचारासाठी रूग्णालयात हलवण्यात आलं आहे. स्थानिकाच्या मदतीने सर्वांना बाहेर काढण्यात आलं आहे.

## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# प्लास्टिक बंदीः आधी केले मग विचार केला

'आधी केले मग सांगितले' या उक्तीचा अभिमान कार्यतत्परांनी मानणे ठीक. परंतु या उक्तीचे रूपांतर 'आधी केले मग विचार केला', असे होत असेल तर परिस्थिती गंभीर म्हणायची. आपल्याबाबत ती अधिकच गंभीर ठरते याचे कारण अलीकडे राज्यकर्तेच या पद्धतीने सर्रास वागताना दिसतात. निर्णय घेऊन टाकायचा. पुढचे पुढे. याचा ताजा दाखला म्हणजे राज्य सरकारचा प्लास्टिक पिशव्याबंदीचा निर्णय. प्रत्यक्षात आपली सरकारे वा स्थानिक प्रशासन हे पर्यावरणाच्या चिंतेने व्याकूळ झाले होते, असे नाही. तसे असते तर एकट्या मुंबईतील हजारो बेकायदा कोंबडीकापू दुकानांतून तयार होणारा लाखो टन कचऱ्याचा प्रश्न त्यांना गंभीर वाटला असता. मुंबई या एकाच शहरातील सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय समुद्रात सोडण्याचे पापकर्म थांबले असते. आणि प्लास्टिक आणि अन्य कचऱ्यामुळे आपल्या शहरांचे बकालीकरण बंद नाही तरी कमी झाले असते. ज्यांना ज्यांना पंचतत्त्व म्हणून आपण गौरवतो त्याचा त्याचा आपण उत्तम विनाश करतो. हे आपले पर्यावरणप्रेम. पृथ्वी, आकाश, जल, वायू आणि अग्नी या पंचतत्त्वांतील आपण प्रदूषित करू शकलेलो नाही, असा एकही घटक नाही. हे अशासाठी नमूद करावयाचे की पर्यावरण हा मुद्दा आपल्यासाठी किती दुय्यम आहे ते कळावे, म्हणून. तेव्हा अशा वातावरणातल्या आपल्या सरकारास अचानक पर्यावरणप्रेमाची उबळ येते आणि प्लास्टिक पिशवीबंदी सारखा अर्धाकच्चा निर्णय घेतला जातो. याचे मूळ ना असते पर्यावरणात ना प्लास्टिक वापरात. ते असते हितसंबंधांत. ज्याप्रमाणे मुंबईतील रस्त्यांवर नेमेचि येणाऱ्या पावसापाठोपाठ उगवणाऱ्या खड्ड्यांसाठी पेव्हर ब्लॉकचा पर्याय निवडला जातो आणि ज्यामुळे रस्ते वा मुंबईकरांपेक्षा असे ब्लॉक तयार करणाऱ्या कंपन्यांचे भले होते तसेच या अचानक प्लास्टिकबंदीचे. तेव्हा पर्यावरणप्रेम हे यामागील कारण निश्चितच नाही. तसे ते असते तर प्लास्टिकच्या बाटल्यांवर बंदी घातली गेली असती. त्या बंदीत नाहीत. कारण ज्येष्ठ सेना नेत्याच्या चिरंजीवाचे उद्योग. सदर सेनानेतापुत्राचा प्लास्टिकच्या बाटल्या बनवण्याचा कारखानाच आहे. तेव्हा या बाटल्यांमुळे पर्यावरणास काहीही धोका नाही, असे आपण आता मानायचे. म्हणून या निर्णयामागे पर्यावरण चिंता आहे हे शुद्ध थोतांड. सेनेच्या शिशुशाखेचा कोणी पदाधिकारी परदेशात काहीबाही पाहून येतो आणि आपल्याकडे त्याचे अंधानुकरण करू पाहतो. पुढे धाकल्या साहेबांची इच्छा म्हणून पर्यावरणमंत्रीही ती शिरसावंद्य मानतात आणि इच्छापूर्तीचा अभिनय करीत बरोबर




स्वत:ची आर्थिक समीकरणेही त्यात बसवली जातात. अशा तऱ्हेने प्लास्टिक पिशव्याबंदी होते आणि ती सर्वांनाच इच्छापूर्तीचे समाधान देते. पर्यावरणासाठी काही केले हे दाखवायची सोय झाली म्हणून साहेब खूश आणि हा निर्णय राबवताना होणाऱ्या बेरजेच्या अर्थकारणामुळे संबंधित खातेही खूश. या विधानातील उत्तरार्ध आता मोठ्या जोमाने सुरू होईल. विविध प्लास्टिक उद्योजक, आयातदार वा व्यापारी आता संबंधितांना मागच्या दाराने जाऊन भेटतील आणि या भेटीच्या 'फलश्रुती'नुसार कोणास बंदीतून वगळायचे किंवा नाही, याचा निर्णय घेतला जाईल. तेव्हा पर्यावरणरक्षकांनी महाराष्ट्रापुरती तरी वसुंधरा प्लास्टिकच्या जाचातून सुटणार याचा आनंद मानू नये. भेटीगाठी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे हा आनंद क्षणभंगुरच ठरू शकतो. यातील मूळ प्रश्न असा की प्लास्टिकबंदीच्या या नाटकाची आपणास गरज होती का? आपल्याकडे प्लास्टिकचा अतिवापर हा प्रश्नच नाही. आपला प्रश्न आहे तो अनिर्बंध वापर, हा. वास्तविक आपल्याकडे इतकी प्रचंड लोकसंख्या असूनही प्लास्टिकचा दरडोई वापर हा जागतिक सरासरीपेक्षा कमीच आहे. जगात दर वर्षी दरडोई ११ किलो प्लास्टिकचा वापर होतो. आपल्याकडे तो पाच किलोंच्या आसपास आहे. म्हणजे जागतिक सरासरीच्या निम्मादेखील तो नाही. अमेरिकेसारख्या देशात हेच दरडोई सरासरी प्लास्टिक वापराचे प्रमाण वार्षिक १०९ किलो इतके प्रचंड आहे. तरीही त्या देशात या प्लास्टिकचे ओंगळवाणे दर्शन घडत नाही आणि त्या देशात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्याची सुपीक कल्पना कोणाच्या डोक्यातून येत नाही. याचाच अर्थ असा की प्लास्टिकचे नियंत्रण हा आपला खरा आजार. हा दुसरा मुद्दा. परंतु कोणतीही समस्या असली तरी कशावर तरी बंदी घातल्याखेरीज आपले समाधान होत नाही. वास्तविक अपेक्षित यश मिळविण्यात कोणतीही बंदी आपल्याकडे यशस्वी ठरलेली नाही. उदाहरणार्थ गुजरात वा वर्धा जिल्ह्यतील मद्यबंदी. तरीही आपला बंदीचा सोस काही जात नाही. यास आपले सामाजिक अल्पवयीनत्वदेखील आड येते. कोणी तरी कशावर तरी बंदी घातली की आपले हे अल्पवयीन समाजमन सुखावते. वास्तविक या बंदीमुळे संबंधितांचे अधिकच फावणारे आहे, अनेकांचे आर्थिक हितसंबंध या बंदीत गुंतलेले असतात आणि ती घातली गेली त्यांना लक्ष्मीदर्शन मोठ्या प्रमाणावर होते, हे आपण लक्षातही घेत नाही. तेव्हा आताची प्लास्टिक पिशवीबंदी या सगळ्यास अपवाद आहे असे मानण्याचे काहीही कारण नाही. ज्यांनी तो निर्णय घेतला त्यांची आर्थिक नीतिमत्ता संशयातीत नाही. दंड रकमेबाबतही तेच. भारतीय अर्थशास्त्राचा पाया घालणारा कौटिल्य म्हणतो की नागरिकांसाठी दंड आकारायचाच झाला तर त्याची रक्कम त्यांना परवडेल अशी असावी. प्लास्टिकबंदीचा निर्णय घेणाऱ्यांचा कौटिल्य आदी बुद्धिवंतांशी काहीही संबंध असण्याची सुतरामदेखील शक्यता नाही.

# कर्जमाफी : सरकार आणि विरोधक आमने-सामने

शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची योजना जाहीर झाली त्या घटनेला २८ जून रोजी एक वर्ष पूर्ण झाले. वर्षभरात या योजनेवर अनेक टीका झाल्या. सरकारनेही अनेक वेळा आपली बाजू मांडली. बँकांनी दिलेली चुकीची माहिती आणि ऑनलाईन कर्जमाफी देताना सरकारमधील खासगी लोकांनी केलेल्या गडबडींवर गंभीर आक्षेपही आले. वर्षपूर्तीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेली सरकारची बाजू आणि कर्जमाफी फसवी होती असे सांगत खा. राजू शेट्टी यांनी केलेली कर्जमाफीवरील टीका, दोन्ही गोष्टी वाचकांसमोर दिल्या आहेत. त्यांनीच यातून आपले मत बनवायचे आहे. स्वच्छ, प्रामाणिक, ऐतिहासिक कर्जमाफी! - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



राज्याचे पूर्वीच्या दोन्ही कर्जमाफीच्या तुलनेत एक प्रामाणिक, देशातील सर्वांत मोठी आणि ऐतिहासिक कर्जमाफी राबविण्यात राज्य सरकारला अतिशय चांगले यश आले, याचे आज समाधान आहे. कर्जमाफी देण्यासाठी राज्य सरकार प्रारंभीपासूनच सकारात्मक होते. नुसती कर्जमाफी करून उपयोग नाही, तर आधी शेतीतील गुंतवणूक वाढवायची, त्याला अधिक उत्पन्न प्राप्त करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यायच्या आणि त्यानंतर कर्जमाफी करायची, हे सूत्र राज्य सरकारने स्वीकारले. बळीराजा वारंवार कर्जाच्या विळख्यात अडकू नये, हीच त्यामागची भावना होती. एक प्रामाणिक आणि खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचलेली कर्जमाफी आपण या राज्यात राबवू शकलो. यावरील टीकेकडे आपण फार लक्ष देणार नाही, अलीकडे सकारात्मकतेने, विधायक सूचना करीत कुठल्याही योजनेच्या अंमलबजावणीत सरकारच्या खांद्याला खांदा लावून काम करणारा विरोधी पक्ष राजकारणात नाही. विरोधासाठी विरोध हा एककल्ली कार्यक्रम दुर्दैवाने राजकारणाचा भाग बनला आहे.

२८ जून २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा शासकीय आदेश जारी करताना सर्वांत आधी मनात उद्देश होता, तो अगदी प्रामाणिक शेतकऱ्याचे हित साधण्याचा. बँकेकडून यादी घ्यायची आणि रक्कम देऊन टाकायची, हा विचार सहजपणे अमलात आणता आला असता. पण, त्यातून पुन्हा त्याच धनदांडग्यांना पैसे मिळाले असते आणि गरीब शेतकरी मागे पडला असता. म्हणून ही प्रक्रिया ऑनलाईन राबविण्याचा निर्णय आम्ही घेतला. प्रत्येक गरजू या कर्जमाफीला पात्र ठरावा, म्हणून एकराचे बंधन काढून घेण्यात आले.

# शब्दकोडे क्रमांक-१४



**आडवे शब्द**

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस ३. चामखीळ ४. पराजय ७. कौसल्यापुत्र ९. कर्ज देणारा १०. नवरदेवाकडील मंडळी १२. पंख १३. कपडालत्ता १६. तापविणारा सूर्य १८. गुजराथी नृत्यप्रकार १९. झोपडी २०. भांडण २१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी २३. चप्पल २४. लवकर, वेगाने २६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु २७. बारा वर्षाचा काळ २९. कोर्टातील कथन ३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम ३२. नवरा (ग्रा.) ३५. रमणीय ३६. धुंदी ३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी ४०. श्रीमंत ४१. एक क्षार ४२. रस काढण्याचे यंत्र ४४. चिंतन ४५. अंत:करण ४६. तेज ४८. मध्यभागी ५०. प्रत्येक दिवशी ५२. वांग्याचा खमंग पदार्थ ५३. गुरांचा समुदाय ५४. मऊ ५६. कौरव पांडवांची कथा ५८. पुरुष, शूर पुरुष ५९. समीक्षा ६२. मदनपत्नी ६३. कपटी ६८. एक पालेभाजी ६९. परमेश्वर ७०. चिंता ७२. मिठी ७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा ७४. अजागळ ७६. आशीर्वाद ७९. एकत्रित रडणे ८०. सुगंध ८१. बारावी रास ८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

**उभे शब्द**

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट २. लग्नासाठी जमलेले गणगोत ३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे) ३अ. फुरसत ४. पुन्हा पुन्हा ५. घर ६. आशीर्वाद ७. असुर ८. नामशेष ९. सर्प ११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात १२. अनुमती १४. वाढलेला व्याप १५. वही १७. सोंगट्यांचे वस्त्र १९. झीज, नुकसान २०. पोते २१. दावा २३. हेलपाटा २५. पृथ्वी २६. कुबड २८. घागरा ३०. एकत्र गोळा करणे, जमविणे ३१. श्रीविष्णूचे नावडते फूल ३३. दशमुखी रावण ३४. चाक ३७. एक हिंस्त्र पक्षी ३८. झोंबणारे ३९. लिहिलेले वाचणारा ४०. सन्मानाची रक्कम ४३. पंकज ४४. माझे ४५. इच्छा ४७. अभिप्राय ४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील ५०. इटलीची राजधानी ५१. लोखंड (हिंदी) ५२. ओहोटीच्या विरुद्ध ५३. पाषाणहृदयी ५५. रसदार ५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा ५७. हिंदुस्थान ५८. मौज ६०. फणसाचा एक प्रकार ६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ ६३. गाजावाजा ६४. तोटी ६६. खिडकीची काच ६७. यावर्षी ६८. नोकर ७१. आयुष्य ७५. पुरे! ७७. मादीच्या विरुद्ध ७८. धातूचा जाड-बारीक धागा

## थोडक्यात महत्वाचे

### नीरव मोदीविरोधात इंटरपोलकडून रेड कॉर्नर नोटीस

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** नीरव मोदीविरोधात इंटरपोलने रेड कॉर्नर नोटीस बजावलीय. नीरव मोदीला सदस्य राष्ट्रांनी स्थानबद्ध करावे किंवा अटक करावी, अशा सूचना इंटरपोलनं दिल्यात. पंजाब नॅशनल बँकेचे १३ हजार कोटी रुपये बुडवून नीरव मोदी भारतातून परागंदा झालाय. त्याविरोधात सीबीआयने अगोदरच आरोपपत्र दाखल केलंय.



### ब्रिक्स संमेलनात पाकिस्तानातील दहशतवादचा मुद्दा उचलणार पंतप्रधान मोदी

**मुंबई (अमोल गुडेकर)-** दक्षिण आफ्रिकेमध्ये महिन्याच्या शेवटी ब्रिक्स संमेलनाचं आयोजन करण्यात येणार आहे. या संमेलनानला ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिकेचे नेते सहभागी होणार आहेत.



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील या संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. याआधी मागील आठवड्यात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजीत डोभाल हे ब्रिक्स सुरक्षा बैठकीत सहभागी होण्यासाठी डरबनला गेले होते. यावेळी त्यांनी भारताची बाजू भक्कमपणे मांडत म्हटलं की, सीमे पलीकडून होत असलेला दहशतवाद रोखण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न नाही केले गेले. बैठकीत डोभाल यांनी म्हटलं की, 'या गोष्टीचा शोध घेतला पाहिजे की, दहशतवादाचा अड्डा चालवणाऱ्या देशांनी त्यांच्या धरतीवर दहशतवाद संपवण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत का?'या संमेलनात पंतप्रधान मोदी सीमेपलीकडून पाकिस्तानकडून होणाऱ्या दहशतवादावर प्रहार करु शकतात. मागच्या वर्षी बिक्स संमेलनात भारताने त्यांच्या घोषणापत्रात दहशतवादासाठी पाकिस्तानातील समूह लश्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मद यांची नावं पुढे आणली होती. हे सगळं रशियाच्या मदतीने झालं होतं.२०१६ मध्ये गोवामध्ये झालेल्या संमेलनात चीनचा विरोध असल्याने या समुहांची नावं घेता आली नव्हती. पण डिसेंबर २०१७ मध्ये आरआयसी (रशिया, भारत, चीन) यांच्या संयुक्त समिती द्वारा हे घोषणापत्र बदलण्यात आलं आणि पण यामध्ये समुहांचं नाव न घेता फक्त आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि दहशतवादी संघटना यांच्याविरोधात पाऊल उचलण्याची चर्चा झाली होती.

### 'संजू'ला जोरदार फटका... इंटरनेटवर लीक

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** अभिनेता संजय दत्त याचा बायोपिक 'संजू' प्रदर्शित झाल्यानंतर कमाईचे अनेक रेकॉर्ड बनवत आहे. परंतु, प्रदर्शित झाल्यानंतर लगेचच हा सिनेमा इंटरनेटवर लीक झाला. हा सिनेमा फेसबुकवरही अपलोड करण्यात आला. शिवाय हा सिनेमा एका वेबसाईटवरही अपलोड करण्यात आला. 'टोरंट'वरही हा सिनेमा लीक करण्यात आला. काही युझर्सनं हा याचे स्क्रीन शॉट ट्विटरवरही शेअर केले.कारवाईच्या भीतीने नंतर मात्र, फेसबुकवरून हा सिनेमा हटवण्यात आला. परंतु, अद्यापही 'संजू' सिनेमाची हाय डेफिनेशन प्रिंट इंटरनेटवर पाहायला मिळतेय. रणबीरच्या फॅन्सनं यावर आपली नाराजी व्यक्त केलीय... तसंच प्रेक्षकांना हा सिनेमा सिनेमाघरात जाऊन पाहण्याची विनंती केलीय.




## टाईमपास

ऐश्वर्या : तुझ्या पतीचा हळूहळू गोरा रंग होत चाललाय याचे कारण काय?

काजोल : अगं, पूर्वी ते कोळशाच्या वखारीत कामाला होते. आता ते पिठाची चक्की चालवतात.

---

एका शिक्षिकेने विद्यार्थ्यांना क्रिकेट मॅचवर एक निबंध लिहायला सांगितला. तास संपत आल्यावर बाई निबंध पहायला गेल्या. एका आळशी मुलाने फक्त दोनच वाक्य लिहिली होती. 'वाईट हवामान, पाऊस पडत असल्यामुळे क्रिकेटची मॅच होणार नाही. '

---

नव्याने डॉक्टर झालेला एक तरुण खेडेगावी गेला. 'डॉक्टरचा धंदा चालेल की नाही इथे? त्याने एका खेडूताला विचारले. तसे काही सांगता येत नाही खेडूत उत्तरला. 'का बरं?' डॉक्टरांनी विचारले. 'त्याचे असे आहे की, गेल्या वर्षी या गावात केवळ एकच माणूस मेला.' खेडूत. 'कोण होता तो? कशामुळे गेला तो?' डॉक्टरांनी उत्सुकतेने विचारले, 'डॉक्टरच होता तो. उपासमारीने मेला.' खेडूताने माहिती पुरविली.

## सुडोकू क्रमांक-१४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 6 | | | 4 | 7 | | |
| | 5 | 4 | 7 | | | 2 | | 1 |
| 7 | | | 1 | 2 | | | | |
| 3 | | | | 1 | | | | |
| 1 | 9 | 8 | | 6 | | 3 | 7 | 5 |
| | | | | 5 | | | | 4 |
| | | | | 7 | 3 | | | 9 |
| 4 | | 3 | | | 1 | 5 | 2 | |
| | | 1 | 2 | | | 8 | | 7 |




**सुविचार** डोक्यावर बर्फ व जीभेवर साखर असली की सारे प्रश्न आपोआप सुटतात.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** आपले मन धार्मिक, अध्यात्मिककडे झुकल्याने मानसिक शांती मिळेल. जीवनसाथीकडून आपल्याला पूर्ण सहकार्य मिळेल.

**वृषभ-** व्यापारात अचानक परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. व्यापारात वाढ होईल.

**मिथुन-** मित्रांच्या सहकार्याने आपली अडकलेली काम पार पडतील. आपल्याला विशेषाधिकार प्राप्त होतील.

**कर्क-** आपल्या योजनेप्रमाणे कार्य पार पडतील. सौजन्यपूर्वक व्यवहार आपल्याला अडचणीतून वाचवील.

**सिंह-** मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा योग चांगला चालेल.

**कन्या-** आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा. घाईगडबडीने कामे करू नका.

**तूळ-** जी कोणीही व्यक्ति आपल्या संपर्कात येईल तिला आनंदच वाटणार आहे. कामाच्या प्रती बेजबाबदार राहू नका.

**वृश्चिक-** नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील. आर्थिक स्थिती चांगली.

**धनु-** आवक-जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.

**मकर-** कार्यक्षेत्रात भरभराटीचे योग आहेत. ओळख वाढेल. नवीन कामकाजामुळे आपल्याला मान मिळेल.

**कुंभ-** वाद-विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते.

**मीन-** व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने त्याचे फळ कमी मिळेल.

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# प्लास्टिकपेक्षा महापालिकांचे अर्धवट मलनि:सारण प्रकल्प प्रदूषणकारी!

**मुंबई (विशाल कारंडे)- पर्यावरण विभागाने जी प्लास्टिकबंदी लादली आहे त्याच्यामुळे होणाऱ्या प्रदूषणापेक्षा किती तरी जास्त प्रदूषण राज्यातील महापालिका, नगरपालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नसलेल्या किंवा अर्धवट क्षमतेच्या मलनिःसारण प्रकल्पांमुळे होत आहे. मुंबई महापालिकेसारखी देशातील सर्वात मोठी महापालिका जवळपास वीस टक्क्यांपेक्षा जास्त मलमिश्रित पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय अरबी समुद्रात सोडत असून धक्कादायक बाब म्हणजे राज्यातील २७ महापालिकांपैकी १० महापालिकांकडे स्वतःचा मलनिःसारण प्रकल्पही नाही.**

सर्व महापालिकांसह स्थानिक स्वराज्यसंस्थांमधून सुमारे ४० टक्के मलयुक्तपाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नद्या व खाड्यांमध्ये सोडण्यात येते. मुंबई महापालिकेच्या आकडेवारीनुसार रोज अरबी समुद्रात ४९० दशलक्ष लिटर मलमिश्रित पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय सोडले जाते. त्याचप्रमाणे झोपडपट्ट्या तसेच ज्या ठिकाणी मलनि:सारण वाहिन्यांशी जोडणी नाही असे २० टक्के मलयुक्तपाणी प्रक्रियेशिवायच राहत असल्याचे पालिकेच्याच एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. याशिवाय अकोला, मालेगाव, अहमद नगर, धुळे, जळगाव, वसई-विरार, चंद्रपूर, उल्हासनगर, लातुर व परभणी अशा दहा महापालिकांमध्ये मलनि:सारण प्रकल्पच उभारण्यात आले नसल्याने तेथील मलयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नदी व खाडीत सोडण्यात



येत असल्याचे राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. राज्यात सुमारे सात हजार दशलक्ष लिटर मलयुक्तपाणी दररोज तयार होत असून त्यापैकी सुमारे चाळीस टक्के सांडपाणी अथवा मलयुक्त पाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नद्या व खाड्यात सोडण्यात येत असून यामुळे तसेच औद्योगिक प्रदूषणामुळे राज्यातील ४९ नद्यांचे पट्टे प्रदूषित होत असतात. याव्यतिरिक्त अनेक महापालिकांकडे पूर्ण क्षमतेचे मलनि:सारण प्रकल्प नसल्यामुळे अनेक महापालिकांमधून मोठ्या प्रमाणात प्रदूषित पाणी सोडण्यात येते. सांडपाण्यावर प्रक्रिया करताना त्याचे प्रमाण मोजण्यासाठी बायोलॉजिकल ऑक्सिजन डिमांडचा विचार केला जात असून हे प्रमाण १०० मिलिग्राम प्रति लिटर एवढे असणे आवश्यक असते.

# 'भंगार' विमाने पुरविणाऱ्या कंपनीवर कारवाई करा!

**मुंबई (स्वरूप पंडित)- उभ्या मुंबईचा थरकाप उडविणाऱ्या घाटकोपरच्या विमान दुर्घटनेनंतर यूवाय एव्हिएशनच्या हवाई वाहतूक डव्यवसायातील व्यवहारांवर असंख्य प्रश्नचिन्हे उमटू लागली असून, कालच्या दुर्घटनेच्या तपासातून या कंपनीच्या बेफिकीर कारभाराचे बुरखे फाडले जावेत, अशी अपेक्षा या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त होत आहे. सरकारने गांभीर्याने तपास करून या क्षेत्राला काळिमा लावणाऱ्या या कंपनीचे पितळ उघडे पाडावे व मानवी जिवाशी खेळ करण्याचे धंदे बंद करावेत, असा सूरही या क्षेत्रात उमटत आहे.**

उत्तर प्रदेश सरकारने भंगारात काढलेले व कित्येक वर्षे जमिनीवरच असलेले यूवाय एव्हिएशनचे हे विमान गुरुवारी नारळ फोडून हवेत उडविण्यात आले, आणि काही मिनिटांतच पाच जणांचा बळी घेत ते दुर्घटनाग्रस्त झाले. खराब हवामान आणि विमानाची तंदुरुस्ती हे दोन्ही मुद्दे विचारात न घेताच या विमानाचे उड्डाण करण्यास भाग पाडल्यामुळेच हा अपघात झाला, असे दुर्दैवी मृतांच्या कुटुंबीयांचे म्हणणे असल्याने या दुर्घटनेचे गांभीर्य वाढले आहे. या विमानाची मालकी उत्तर प्रदेश सरकारकडे असतानाच त्याला झालेल्या



अपघातानंतर २०१४ मध्ये ते विक्रीस काढण्यात आले, तेव्हा ते उड्डाणाच्या स्थितीत नसल्याने सुटे भाग करून कंटेनरमधून वाहतूक करून ते मुंबईत आणण्यात आले व सुटे भाग पुन्हा जोडून त्याचे विमान बनविण्यात आले. उड्डाणासाठी आवश्यक असलेले विविध परवाने मिळविण्यास संबंधिक यंत्रणांकडे प्रचंड पाठपुरावा करावा लागतो. पण या कंपनीस मात्र, वापरण्यास योग्य नसलेली विमाने वा हेलिकॉप्टर सेवेत आणण्यासाठी कमीत कमी प्रयासात सारे परवाने कसे प्राप्त झाले याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी केली जात आहे.

# मुंबई उपनगरातील वीज व्यवसाय रिलायन्सकडून अदानींच्या ताब्यात

**मुंबई (विशाल कारंडे)-** अनिल धीरूभाई अंबानी समूहातील रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कर्जाच्या डोंगराखाली असलेल्या कंपनीचा मुंबई उपनगरासाठीचा वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरणाचा एकात्मिक व्यवसाय विकत घेण्यासाठी गुजरातमधील अदानी समूहाने केलेल्या १८ हजार ८०० कोटींच्या व्यवहाराला राज्य



वीज नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे. यातून कंपनीवरील सर्व कर्ज फेडून तीन हजार कोटी रुपये रिलायन्सच्या तिजोरीत शिल्लक राहतील. रिलायन्स-अदानी व्यवहाराला रिलायन्सच्या भागधारकांची आणि केंद्रीय स्पर्धा आयोगाची (कॉम्पिटिशन कंपनी ऑफ इंडिया) परवानगी आधीच मिळालेली आहे. आता राज्य वीज नियामक आयोगाची मंजुरी मिळाल्याने जुलै २०१८ अखेपर्यंत उभय कंपन्या आर्थिक देवाणघेवाण आणि कागदोपत्री व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर हा वीज व्यवसाय अदानी ट्रान्समिशन लि.च्या ताब्यात जाईल, असे रिलायन्सच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

अनिल धीरूभाई अंबानी समूह आर्थिक संकटात असून मार्च २०१७ अखेर समूहातील विविध कंपन्यांवर एकूण सव्वा लाख कोटी रुपयांचे कर्ज होते. त्यामुळे आपल्या विविध व्यवसायांची विक्री करून कर्ज फेडण्याचा मार्ग समूहाचे प्रमुख अनिल अंबानी स्वीकारला. त्यानुसार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या अखत्यारीतील डहाणूचा ५०० मेगावॉटचा वीजनिर्मिती प्रकल्प, वीज पारेषण यंत्रणा आणि मुंबईतील वीज वितरण व्यवसाय असा एकात्मिक वीज व्यवसाय विकण्यासाठी अदानी समूहासह त्यांची बोलणी होऊन डिसेंबर २०१७ मध्ये १८ हजार ८०० कोटी रुपयांना व्यवहार ठरला. केंद्रीय वीज कायद्यानुसार अशा व्यवहाराला राज्य वीज नियामक आयोगाची मंजुरी बंधनकारक असते. त्यामुळे याबाबत वीज आयोगात अर्ज करण्यात आला होता. त्यावर १४ जून रोजी अंतिम सुनावणी होऊन आनंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील राज्य वीज नियामक आयोगाने रिलायन्स-अदानी व्यवहाराला मंजुरी दिली.

# मुंबईतील ब्रिटिशकालीन इमारतींना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान

**मुंबई (प्रतिनिधी)-** मुंबईतील ब्रिटिशकालीन इमारतींना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या स्टेशन पासून ते गेटवे ऑफ इंडिया पर्यंतच्या अनेक इमारती ब्रिटीशकालीन आहेत. या इमारती आजही आपला दिमाख कायम राखत डौलदारपणे उभ्या आहेत आणि मुंबईच्या सौंदर्यात भर घालत आहेत. आता याच इमारतींपैकी काही इमारतींना युनेक्सोकाच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. मुंबईसाठी ही नक्कीच गौरवास्पद बाब ठरली आहे. १९ व्या शतकातील व्हिक्टोरियन



संरचना आणि २० व्या शतकातील आर्ट डेको इमारतींचा यात समावेश आहे. शनिवारी बहरिन येथे झालेल्या युनेस्को जागतिक वारसा समितीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. हेरिटेज परवाना फोर्ट प्रेसिंक्ट आणि मरीन ड्राईव्ह प्रेसिंक्ट या दोहोंमध्ये विभागलेला आहे. मुंबई विद्यापीठ इमारत, जुने सचिवालय, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, डेव्हिड ससून ग्रंथालय. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, पश्चिम रेल्वे मुख्यालय आणि आर्ट डेकोच्या सार्वजनिक इमारतींचा समावेश आहे.

# छगन भुजबळ हेच घोटाळ्याचे सूत्रधार!

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** आपण निर्दोष असून आपल्यावर अन्याय झाला असे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ सांगत असले तरी भुजबळांवरील आरोपांबाबत सक्तवसुली संचालनालय ठाम आहे. या संपूर्ण घोटाळ्याचे भुजबळ हेच सूत्रधार असल्याचा आरोप संचालनालयाने नव्याने दाखल केलेल्या पुरवणी आरोपपत्रात केला आहे. छगन भुजबळ यांनी संपूर्ण घोटाळ्यात आपल्या मंत्रिपदाचा गैरवापर केला आणि राज्य शासनाची फसवणूक केली, असा आरोपही यात करण्यात आला आहे. महाराष्ट्र सदन आणि सांताक्रूझ-कालिना येथील राज्य ग्रंथालय या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोन स्वतंत्र



गुन्हे दाखल केले. त्यापाठोपाठ संचालनालयानेही दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करून छगन व समीर भुजबळ यांना अटक केली. ते दोघेही सध्या जामिनावर आहेत. संचालनालयाने तिसरा गुन्हा दाखल करीत पुरवणी आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले. या गुन्ह्यात भुजबळ यांच्यासह इतर सर्वांनी जामिनासाठी अर्ज तयार ठेवले होते. परंतु फक्त दिलीप खैरे हे नवे संशयित आरोपी असल्याचे स्पष्ट करीत त्यांना जामीन मंजूर केला आणि ६ ऑगस्टपर्यंत सुनावणी पुढे ढकलली. महाराष्ट्र सदन व इतर प्रकरणात राज्य शासनाचे ८४० कोटींचे नुकसान झाले. त्यास भुजबळ हेच जबाबदार आहेत, असे आरोपपत्रात नमूद आहे. २९१ कोटींच्या मालमत्तेचा आतापर्यंत संचालनालयाला शोध घेता आला आहे. २००७ ते २०१० या काळात १२३ कोटी रुपये सुरेश जाजोदिया, चंद्रशेखर सारडा, प्रवीण जैन आणि संजीव जैन यांच्यामार्फत विविध कंपन्यांत गुंतवून त्या मोबदल्यात समभाग घेतल्याचेही दाखविण्यात आले असले तरी हे बनावट व्यवहार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परवेझ कन्स्ट्रक्शन या कंपनीला ७० कोटी रुपये १९ कंपन्यांकडून मिळाले आहेत तर आर्मस्ट्राँग एनर्जी प्रा. लि. या कंपनीला १८ कंपन्यांकडून ५१ कोटी मिळाले आहेत.

# लाईफलाईन ठरतेय जीवघेणी, लोकलमधून पडून ३ दिवसात १७ मृत्यू

**मुंबई (विशाल कारंडे)-** मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर चालणाऱ्या लोकल्स या मुंबईच्या जीवनवाहिनीच समजल्या जातात. मात्र मागच्या तीन दिवसात याच दोन मार्गांवर लोकलमधून पडून एकूण १७ जणांचा मृत्यू झाला आहे. २६ जून ते २८ जून या तीन दिवसांच्या कालावधीत हे सगळे मृत्यू झाले आहेत. फेसबुक



या सोशल नेटवर्किंग वेबसाईटवर Mumbai Train updates नावाचे एक फेसबुक पेज आहे. या फेसबुक पेजचे ॲडमिन मंदार अभ्यंकर यांनी ही माहिती पोस्ट केली आहे. २६ जून रोजी ३ जण ठार झाले आहेत तर ११ जण जखमी झाले आहेत. पालघर स्थानकात १, वसई रोड स्थानकात १ तर वडाळा स्थानकात १ मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. या दिवशी एकूण ११ जण जखमी झाले आहेत. २७ जूनला एकूण ६ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे तर ४ जण जखमी झाले आहेत. तर २७ जूनला ८ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे आणि ५ जण जखमी झाले आहेत. मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावरून धावणाऱ्या लोकल या मुंबईच्या लाईफलाईन मानल्या जातात. मात्र याच लाईफलाईन मुंबईकरांसाठी जीवघेण्या ठरत आहेत.

# ध्वनिप्रदूषणाने त्रस्त नागरिकांचे काय?

**मुंबई (रूपाली भोसले)-** मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम दिवसरात्र केले जावे की नाही हा मुद्दा नाही तसेच मुंबईसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी दिवसरात्र काम करण्यास आमचाही विरोध नाही. परंतु असे असले तरी आणि ध्वनिप्रदूषण नियम मेट्रो प्रकल्पासाठी लागू होऊ शकत नाही हा सरकारचा दावा मान्य केला तरी प्रदूषणमुक्त वातावरण उपभोगण्याचे, ते उपलब्ध होण्याच्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे काय? त्याचे संरक्षण सरकार कशाप्रकारे करणार? लोकांना या कामाचा त्रास झाल्यास त्यांना दाद मागण्याच्या यंत्रणेचे काय? अशी प्रश्नांची सरबत्ती उच्च न्यायालयाने शुक्रवारी मुंबई मेट्रो रेल महामंडळाकडे (एमएमआरसीएल) केली. तसेच सोमवारपर्यंत त्यावर खुलासा करण्याचे आदेशही दिले. 'मेट्रो-३'च्या कफ परेड येथील भुयाराचे काम जलदगतीने पूर्ण करता यावे याकरिता



दिवसरात्र (२४ तास) काम करू देण्याच्या मागणीसाठी मुंबई मेट्रो रेल प्राधिकरणाने (एमएमआरसीएल) उच्च न्यायालयात याचिका केली आहे. या कामाच्या वेळी ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन होणार नाही, अशी हमी देण्याबाबत प्राधिकरणाने कुठलेही वक्तव्य करण्यास नकार दिला होता. न्यायमूर्ती अभय ओक आणि रियाज छागला यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी शुक्रवारी सुनावणी झाली. त्या वेळी पर्यावरण संरक्षण कायदा आणि ध्वनिप्रदूषण नियम मेट्रोच्या कामांना लागू होतात की नाही, असा सवाल न्यायालयाने प्राधिकरणाला केला. त्यावर मेट्रोच्या कामांना हे दोन्ही कायदे लागू होत नसल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला. मेट्रोला कोकण रेल्वे कायदा लागू असून पर्यावरण संरक्षण कायद्यातून कोकण रेल्वे प्रकल्पाला वगळण्यात आले होते. परिणामी ध्वनिप्रदूषण नियमही त्याला लागू होऊ शकत नाही, असे महाधिवक्त्यांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. मात्र सरकारचा हा दावा मान्य केला आणि प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेतले तरी प्रदूषणमुक्त वातावरण उपभोगण्याचा, ते उपलब्ध होण्याच्या नागरिकांना घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाराचे काय, या अधिकाराचे संरक्षण करण्याकरिता सरकार ध्वनिप्रदूषण नियमांचे पालन करणार नाही का, असा उलट सवाल न्यायालयाने केला.

# 'मालमत्तेच्या कोणत्याही वादावर निर्णय घेण्याचा अधिकार न्यायालयाला'

**मुंबई (हर्षद परब)-** राज्यातील जमिनीशी निगडीत कोणत्याही वादावर न्यायनिवाडा करण्याचा अधिकार हा कायद्यानुसार दिवाणी न्यायालयाला आहे. मंत्र्यांना याबाबतचे निर्णय घेण्याचा अधिकार नाही, असे स्पष्ट करत मावळ येथील एका जमीन प्रकरणात महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मार्च महिन्यात दिलेला निर्णय उच्च न्यायालयाने नुकताच रद्द केला.

मावळस्थित उषा भौमिका यांनी आपल्या जमिनीचा विकास करण्यासासंदर्भात रमेश मोदी आणि भरत मोदी यांच्यासह अन्य दोनजणांसोबत करार केला होता. भौमिका आणि मोदी यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार मोदी यांनी भौमिका यांना ठराविक रक्कम देऊन खरेदीखत आणि पॉवर ऑफ ॲटर्नीबाबच नोंदणी करून घेतली. पुढे भौमिका यांचा मृत्यू झाला. त्यामुळे रमेश मोदी यांनी ती जमीन स्वत:च्या नावावर करून घेतली.



परंतु भौमिका यांचा नातू सिद्धार्थ याने मोदी यांच्या कृतीला आक्षेप घेतला आणि व्यक्तीच्या मृत्यूनंतर जमिनीबाबत केलेले मुख्त्यारपत्रही रद्द होत असल्याचा दावा केला. त्याचा हा दावा तलाठी आणि प्रांत अधिकाऱ्यांकडूनही मान्य करण्यात आला. त्याविरोधात मोदी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली.

त्यावर मोबदला घेऊन मुखत्यारपत्र तयार केले तर ते रद्द होऊ शकत नाही, असा निर्वाळा त्यांनी दिला आणि मोदी यांना दिलासा दिला. या निर्णयाविरोधात भौमिका यांच्या नातवाने अतिरिक्त आयुक्तांकडे धाव घेतली. अतिरिक्त आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांचा हा निर्णय रद्द केला. परंतु हे सगळे इथेच थांबले नाही, तर प्रकरण महसूल मंत्र्यांपर्यंत पोहोचले. महसूल मंत्र्यांनीही सुरूवातीला अतिरिक्त आयुक्तांच्या निर्णयाला स्थगिती दिली. मात्र नंतर ह स्थगिती उठवत संबंधित करार रद्द करण्याचा अतिरिक्त आयुक्तांचा निर्णय कायम ठेवला.

# मुंबईचा पाया खचला आहे, उद्या शहर कोसळेल

**मुंबई (सम्यक कासारे)- वडाळ्यात जमीन खचून झालेल्या दुर्घटनेनंतर लगतच्या गगनचुंबी इमारतींमधील रहिवाशांच्या पायाखालची जमीनच सरकली. यानिमित्ताने पुन्हा मुंबईचा पाया, विकास प्रकल्प, महापालिकेचे कुचकामी धोरण, कायद्याची होणारी पायमल्ली, विकासकांचा मनमानी कारभार; असे अनेक मुद्दे चर्चेला आले. याच मुद्द्यांवर बोट ठेवत दुर्घटनांना नेमके कारणीभूत कोण, कोणाचे कुठे आणि काय चुकते आहे, खरेच मुंबईचा पाया खचला आहे का?**

'मुंबईचा पावसाळा. नेमेची येतो. येतो तोच संकटांची मालिका घेऊन. संकटांचे स्वरूपही नेहेमीचेच. मिठीला पूर, झोपडवस्त्यांत पाणी; डोंगर उतार, रस्ते, जमिनी खचणे, सखल भागांत पाणी, जुन्या इमारतींची, झाडांची पडापड, रस्त्यावर आणि रेल्वेमार्गावर पुराचे पाणी, वाहतुकीचा बट्ट्याबोळ, विस्कळीत जनजीवन, उंच इमारतींमधील अपघात आणि अग्निशमन दलाची



धावाधाव. गेली अनेक दशके तेच घडत आले आहे आणि संकटांची संख्या, तीव्रता, जीवितहानी आणि नुकसान, लोकांचे हाल. त्याच बातम्या, तेच वर्तमानपत्री मथळे आणि तेच तेच दोषारोप. मुंबईतील नैसर्गिक वा इतर कोणत्याही नागरी समस्यांचे खापर नेहमी मुंबईमध्ये असलेल्या-नसलेल्या प्रशासकीय यंत्रणेवर फोडण्याची प्रथा पडली आहे. पण ही यंत्रणा इतकी क्लिष्ट आणि मोठी आहे; आणि सातत्याने दुषणे घेत कोडगी झालेली आहे. हे प्रशासनाला इतके सवयीचे झाले आहे की त्यामुळे प्रशासन कोडगे तर शहराचे नगरसेवक आणि राज्यकर्ते बेजबाबदार बनले आहेत. गेंड्याची कातडी पांघरलेले लोकशाही सरकार किंवा इतर काहीही विशेषणे लावली तरी हलणे, हलविणे आणि सुधारणे दिवसेंदिवस अवघड बनत आहे. वडाळा येथील अण्टॉप हिल भागातील उच्चभ्रू, उत्तुंग इमारतींमधील रहिवाशांच्या प्रतिक्रिया आल्या आहेत. 'आम्ही रस्त्यावर आलो' ही त्यांची प्रतिक्रिया फार बोलकी आहे. काही दशकांपासून अनधिकृत झोपडवस्त्यांवर प्रशासनाची कारवाई झाली की असे मथळे वाचायला मिळत असत.

आता तीच भावना कोट्यवधी रुपये किमतीच्या, तथाकथित अधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांनी व्यक्त केली आहे. याचाच अर्थ गरीब असो नाही तर श्रीमंत, मुंबईमध्ये कोणाही नागरिकाला काही किंमत उरलेली नाही आणि सर्व नागरिक आता अगतिकतेच्या समान पातळीवर आले आहेत. मुंबईच्या प्रशासनाला जशी नागरिकांची किंमत नाही तशीच नगर रचनाकार, वास्तुरचनाकार आणि इमारतींचे बांधकाम भक्कम, सुरक्षित करणाऱ्या सिव्हिल इंजिनीअर आणि इतर व्यावसायिकांचीही किंमत उरलेली नाही. वास्तवात कोणत्याही शहराला सक्षमपणे कार्यरत ठेवण्यासाठी गरज असते ती भौतिक साधने आणि समस्या सोडवू शकणाऱ्या मानवी क्षमतांची. या दोन गोष्टी जेव्हा कल्पकतेने नागरी वस्त्या घडवतात, त्यांचे नियमन आणि व्यवस्थापन करतात तेव्हाच शहरे नागरिकांसाठी सुरक्षित, सुखकारक, समृद्धी देणारी होतात.

डीजीआयपीआर/२०१८-२०१९/१५०९

# अंकित तिवारीच्या वडिलांना मारहाण, कांबळीच्या पत्नीविरोधात तक्रार

**मुंबई (सम्यक कासारे)-** भारतीय क्रिकेट संघाचा माजी फलंदाज विनोद कांबळी याच्या पत्नीविरोधात मारहाणीची तक्रार नोंदवण्यात आली आहे. गायक अंकित तिवारीचे वडील आरके तिवारी यांनी ही तक्रार दाखल केली आहे. मॉलमध्ये विनोद कांबळीच्या पत्नीने मारहाण केल्याप्रकरणी आरके तिवारी यांनी मुंबईतील बांगूरनगर पोलिस स्टेशनमध्ये रविवारी (१ जुलै) तक्रार नोंदवली.मालाडच्या इनऑर्बिट मॉलमध्ये रविवारी विनोदची पत्नी अँड्रियाला एका व्यक्तीने चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. अँड्रियाने अंकित तिवारीच्या वडिलांवर आरोप केला. मात्र अंकित तिवारीचा मोठा भाऊ अंकुरने विनोद आणि त्याच्या पत्नीवर विनाकारण मारहाण केल्याचा आरोप केला आहे. यानंतर त्यांनी बांगूरनगर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली.विनोद कांबळीच्या आरोपानुसार, रविवारी आपण कुटुंबासह मालाडमधील इनऑर्बिट मॉलच्या गेम झोनमध्ये होते. त्यावेळी एका व्यक्तीने माझ्या पत्नीला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. मग त्या व्यक्तीसोबत आणखी दोन पुरुष आले आणि माझ्या पत्नीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मी त्यांना मागे हटण्यास सांगितलं. मात्र आम्ही कोण आहोत, हे तुला माहित नाही, असं त्यांनी उत्तर दिलं.



# अकोल्याच्या पालकमंत्र्यांसह अख्खं जिल्हा प्रशासन दिवसभर बांधावर

**अकोला (सुनील आढाव)–** एक दिवस शेतकऱ्यांसोबत या उपक्रमांतर्गत संपूर्ण जिल्हा प्रशासन आणि पालकमंत्र्यांनी अकोल्याच्या शेतकऱ्यांसह संपूर्ण दिवस बांधावर घालवला. अकोल्याचे पालकमंत्री डॉ. रणजीत पाटील आणि प्रशासनाने शेतात जाऊन शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या.रणजीत पाटील आणि प्रशासनाने अकोला तालुक्यातील डोंगरगाव, मासा-सिसा, उदेगाव येथे भेट दिली. रणजीत पाटील आणि जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडेय यांनी डोंगरगावचे शेतकरी मधुकर देवकर यांच्या शेतात हातावर भाकरी घेत भोजनाचा आनंद घेतला. या उपक्रमात पालकमंत्री, जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी आणि सूचना ऐकून घेतल्या. हे अभियान जिल्हाभरात राबवलं गेलं. विविध विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सुमारे १० हजार शेतकऱ्यांशी याद्वारे संवाद साधण्यात आल्याची माहिती देण्यात आली.शेतकरी भेटीदरम्यान पालकमंत्र्यांनी डवरणीचाही अनुभव घेतला. तर शेतमजुरांशी संवाद साधत त्यांच्याही अडचणी समजून घेतल्या.



# सरकारी उत्पन्नाच्या ऐतिहासिक पावलांत सवाधिक फायदा GST मुळे, ४ लाख कोटी रु. वाढणार

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)- देशातील गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (जीएसटी) ही सर्वात मोठी कर सुधारणा लागू होऊन आज एक वर्ष पूर्ण झाले. जीएसटीमुळे २०१८-१९ या चालू वित्त वर्षात सरकारच्या कर गंगाजळीत सुमारे ४ लाख कोटी रुपयांची वाढ होऊ शकते. जीएसटी कलेक्शनमुळे २०१८-१९ मध्ये २ लाख कोटी अतिरिक्त महसूल मिळू शकतो.**

दुसरीकडे प्राप्तिकरही २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मिळेल, अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे सरकारी तिजोरी भरण्यासाठी सरकारने जेवढी मोठी आणि ऐतिहासिक पावले उचलली आहेत, त्यात जीएसटी सर्वात मोठे पाऊल ठरत आहे. उदा. आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या कोळसा लिलावातून सरकारला २०१५ मध्ये ३२ कोळसा पट्ट्यांतून २.७ लाख कोटी रुपये मिळाले होते. स्पेक्ट्रम लिलावाच्या सर्वात मोठ्या प्रयत्नात २०१६ मध्ये सरकारला सुमारे ६५ हजार कोटी रुपये मिळाले होते, तर उद्दिष्ट ५.६३ लाख कोटी मिळवण्याचे ठेवण्यात आले होते. २०१६ मध्ये सरकारने नोटबंदीचे ऐतिहासिक पाऊल उचलत प्राप्तिकरात ९० हजार कोटी रुपयांची वाढ केली होती. मोदी सरकारच्या इन्कम डिक्लरेशन स्कीमला विरोधी पक्षांनी फेअर अँड लव्हली स्कीम असेही म्हटले होते, त्या योजनेद्वारेही सरकारी तिजोरीत सुमारे ३० हजार कोटी रुपये आले होते.



आता जीएसटीचा विचार केल्यास सरकारने चालू आर्थिक वर्षात दर महिन्याला १ लाख कोटी जीएसटी वसुलीसह वर्षअखेरपर्यंत किमान १२ लाख कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट ठेवले आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षात जुलै ते मार्चपर्यंत जुलै ते मार्चपर्यंत जीएसटीच्या रूपाने ७.१९ लाख कोटी रुपये वसूल करण्यात आले. जीएसटीचा परिणाम प्राप्तिकर वसुलीवरही दिसला. अर्थ मंत्रालयानुसार, २०१७-१८ या गेल्या वित्त वर्षात २०१७-१८ मध्ये प्राप्तिकरातून १०.०२ लाख कोटी रुपये मिळाले होते. २०१६-१७ या वर्षाच्या तुलनेत ही रक्कम १८ टक्के जास्त आहे. २०१६-१७ मध्ये प्राप्तिकरातून ८.५ लाख कोटी रुपये मिळाले होते. कर तज्ज्ञांच्या मते जीएसटी रिटर्न फायलिंगमध्ये लावलेल्या कलमांमुळे चालू आर्थिक वर्षात प्राप्तिकराच्या वसुलीत २० टक्क्यांची वाढ होण्याचा अंदाज आहे.

# रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालय परीसातील वाहन पार्किंगला लागली शिस्त

**रत्नागिरी (योगेश होळंब)-** जिल्हाधिकारी कार्यालय विस्तृत असून त्या ठिकाणी आजूबाजूच्या तालुक्यातून येणारी जनता तसेच कर्मचारी आपापल्या गाड्या योग्य प्रकारे पार्क करत नसल्याने पार्किंगचा तसेच वाहतूकीचा मोठा प्रश्न होता मात्र सध्या नव्याने वाहतूक शाखेचा कार्यभार सांभाळणारे पोलीस निरीक्षक अनिल विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी उपायोजना करून सर्व वाहने एका रांगेत तसेच एका बाजूला लावण्यासाठी पार्किंगची व्यवस्था केली. यापूर्वी जागा अपुरी पडत असल्याने गाड्या कशाही पार करणाऱ्यांना त्यामुळे चाप बसला असून त्यांची मोठी पंचायत झाली आहे. वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे अनेकांना दंडही भरावा लागला आहे. मात्र वाहतूक पोलीसांनी लावलेल्या शिस्ती मुळे येणारी सर्व सामान्य जनता वाहतूक पोलिसांचे अभिनंदन करत आहे.



# एसटीच्या वेतनकराराला अखेर मंजुरी

**मुंबई (प्रतिनिधी)-** एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचा २०१६ ते २०२०च्या वेतनकराराला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे जुलै महिन्यापासून नवीन वेतनवाढ लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आता जून महिन्यात मिळणार पगार वाढीव असेल. एसटी कर्मचाऱ्यांचा दर चार वर्षांनी वेतनकरार होतो. मात्र २०१६ ते २०२०चा वेतनकरार करण्यासाठी एसटी प्रशासन आणि मान्यता प्राप्त संघटना यांच्यामध्ये एकमत होत नसल्याने हा वेतनकरार रखडला होता. मान्यता प्राप्त



संघटनेसोबत वेतनकरारासाठी ३३ बैठका झाल्या होत्या. तर वेतन कराराला तब्बल २३ महिने विलंब झालेला आहे. त्यामुळे परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी ४८४९ कोटींचा वेतन करार ५ जून रोजी जाहीर केला होता. तो मान्य नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी ८ अणि ९ जून रोजी दोन दिवसांचा अघोषित संप केला होता. त्यानंतरही वेतन करारावर कोणताही तोडगा निघाला नव्हता. अखेर आता राज्य सरकारनेच कामगार कराराला मंजुरी दिल्यामुळे हा वेतनकरार लागू करण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. या वेतनवाढीमुळे कर्मचाऱ्यांचा पगार पाच ते १२ हजारांपर्यंत वाढणार आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी तीन वर्षे कनिष्ठ वेतनश्रेणीत काम केले आहे.

# पॅन–आधार कार्ड लिंक करण्यासाठी आता ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली (पीटीआ)–** आता ३१ मार्च २०१९ पर्यंत पॅन कार्डला आधार कार्ड लिंक करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. ३० जूनपर्यंतची मुदत यापूर्वी देण्यात आली होती. पण शनिवारी करदात्यांना केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) पॅन क्रमांक आणि आधार एकमेकांशी लिंक करण्यासाठी दिलेली मुदत पुढील वर्षाच्या मार्चअखेरपर्यंत वाढवली. आतापर्यंत पॅन-आधार लिंक करण्यासाठी ३१ जुलै २०१७, ३१ ऑगस्ट २०१७, ३१ डिसेंबर २०१७, ३० जून २०१८ व आता ३१ मार्च २०१९ अशी पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. ३३ कोटींपैकी १६ कोटी ६५ लाख पॅन



कार्ड गेल्या मार्चअखेरपर्यंत आधारशी लिंक केल्याची माहिती आहे.

बँक खाते, मोबाइल क्रमांक आदींसाठी आधार लिंक करणे केंद्र सरकारने अनिवार्य केले आहे. तसेच एलपीजी गॅसमधील अनुदान आणि इतर योजनांचा लाभ मिळवण्यासाठी केंद्राने केलेल्या आधार सक्तीचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात आहे. न्यायालयाने विविध सेवांना आधार लिंक करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेश दिले होते. सरकारने त्यावेळी अतिरिक्त दोन महिने वाढवत ३० जूनपर्यंतची मुदतवाढ दिली होती. आता पुन्हा पुढील वर्षाच्या ३१ मार्च २०१९पर्यंत ही मुदत वाढवून देण्यात आली आहे.

# ‘राज ठाकरेंचा मनसे पक्ष संपलाय’

**मुंबई (अमोल गुडेकर)-** प्लास्टिक बंदीच्या निर्णयाच सर्व स्तरातून लोक स्वागत करत असताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यापाऱ्यांकडून सुपारी घेऊन शिवसेनेला बदनाम करण्याच काम सुरू केल आहे. मनसे पक्ष संपलाय असे म्हणत पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी राज ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. मुंबईत घाटकोपर येथे शिवसेनेच्या वतीने कापडी पिशव्यांच्या वाटपाचा कार्यक्रम रामदास कदम यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमा दरम्यान पत्रकारांनी राज ठाकरे प्लास्टिक बंदीच्या निर्णयाला विरोध करत असल्याकडे लक्ष वेधन्यात आले. त्यावेळी पर्यावरण मंत्री कदम यांनी राज ठाकरे चुकीचे बोलत आहेत, खरतर या निर्णयाच त्यांनी स्वागत करायला हव होत. सबंध जगाने आज प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला आहे. आपल्या देशाला याच यजमानपद मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.



प्लास्टिक बंदीचा निर्णय एका दिवसात घेतलेला नाही. या निर्णयाला आताच विरोध करणारे नऊ महिने झोपले होते का? त्यांचा पक्ष संपला आहे. व्यापाऱ्यांकडून सुपारी घेऊन ते शिवसनेला बदनाम करत आहेत. राज ठाकरे काळ्या मांजरासारखे या निर्णयाच्या आड येत असल्याचे ते म्हणाले. देशात सद्या १७ राज्यांत प्लास्टिक बंदी आहे. जागतिक निर्णय झाल्यावर महाराष्ट्राने त्याची प्रथम सुरुवात केली आहे.

# भक्तांवर घाला, बस दरीत कोसळून 30 ठार



**पौढी गढवाल (वृत्तसंस्था)-** उत्तराखंडमधील पौढी गढवाल येथे एक प्रवासी बस ६० फूट खोल दरीत कोसळून ३० प्रवासी ठार झाल्याची माहिती हाती आलेय. या अपघातात १२ प्रवासी जखमी झाले असून त्यातील चौघांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती वर्तविण्यात आली आहे. पोलीस व एसडीआरएफची टीम घटनास्थळी पोहोचली आहे. या बसमधील सर्व प्रवाशी हे देवदर्शनासाठी गेल्याचे सांगण्यात येत आहे. उत्तराखंडच्या नैनिडांडा ब्लॉकच्या पिपली-भौन मार्गावरुन ही बस भौन तालुक्यातून रामनगरला जात होती. त्यावेळी धुमकोट येथील एका वळणावर भरधाव वेगात असलेल्या या बसवरीलस चालकाचा ताबा सुटला आणि बस ६० फूट खोल दरीत कोसळली. बस २८ आसनी असून, रस्त्यावरुन कोसळली. बस दुर्घटनेतील २२ लोकांचे मृतदेह हाती लागले आहेत. दरम्यान, बस दरीत कोसळल्यानंतर एका झाडाला लटकली.

# उमेदवारांसाठी भाजप लाचार

**सांगली (वसंत लोखंडे)-** सांगली महापालिका निवडणुकीत भाजपला उमेदवारांसाठी लाचार व्हावे लागत आहे, अशी जोरदार टीका युवक काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष व आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी पत्रकार परिषदेत केली. मतदान व उमेदवारांसाठी भाजप



नेते भेटवस्तूंबरोबर इतर कोणत्याही थराला जातील, अशी बोचरी टीका माजी मंत्री व आमदार सतेज पाटील यांनी यावेळी केली. कदम व पाटील म्हणाले, आजपासून काँग्रेसने इच्छुकांच्या मुलाखती सुरू केल्या आहेत. उमेदवारांचा मोठा प्रतिसाद आहे. सर्व नेते व पदाधिकारी एकजुटीने काम करीत आहोत. त्यामुळे आम्हाला विजयाची खात्री आहे. पक्षात बंडखोरी होऊ देणार नाही. निष्ठावंताना न्याय दिला जाईल. त्यांच्या पाठीशी पक्षाची सर्व ताकद उभी केली जाईल. मुलाखती घेतल्यानंतर ती यादी प्रदेशकडे पाठविली जाईल. तसेच नागपूरमध्ये प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे. यात यादीवर चर्चा केली जाईल. त्यानंतर स्थानिक नेत्यांशी चर्चा करून उमेदवारी अंतिम केली जाईल.

ते पुढे म्हणाले, भाजपचा राज्य व देशात सुरू असलेल्या कारभाराचा वाईट अनुभव जनतेला आला आहे. चार वर्षांत केवळ खोटी आश्वासने, भूलथापा देऊन जनतेची दिशाभूल करण्याव्यतिरिक्त भाजप नेते काहीही करू शकले नाहीत. पाटील म्हणाले, सांगली महापालिका निवडणुकीसाठी तर भाजपला उमेदवार मिळणे मुश्कील झाले आहे. त्यांना दोन अंकी आकडा गाठणेही मुश्कील आहे. जिंकण्यासारखी परिस्थिती नसल्याचे लक्षात आल्यानेच मंत्री चंद्रकांत पाटील यांचा आत्मविश्वास ढळला आहे.

# हायकोर्टाने फटकारल्यानंतरही मराठा आरक्षण लागू होऊ नये ही मुख्यमंत्र्यांची भूमिका- मलिक

**मुंबई (प्रतिनिधी)-** मराठा आरक्षणाबाबत टाळाटाळ करणाऱ्या सरकारला हायकोर्टाने खडे बोल सुनावले आहेत. सरकारने दाखवलेल्या दिरंगाईबाबत हायकोर्टाने विचारणा केली आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी कामाची गती वाढवा आणि येत्या १४ ऑगस्टला होणाऱ्या सुनावणीत आजवरच्या कामाच्या प्रगतीचा अहवाल सादर करा असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. यावर राज्यात मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण लागू होऊ नये अशी भूमिका मुख्यमंत्र्यांची असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रवक्ते आणि प्रदेश उपाध्यक्ष हायकोर्टाने वारंवार विचारणा करुनही सरकार मात्र उत्तर देण्यास टाळाटाळ करत आहे. याबाबतीत सारथी नावाच्या संस्थेला अहवाल सादर करण्यास सांगण्यात आला.

# अनुदानित आणि विनाअनुदानित सिलेंडरच्या दरात वाढ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–** अनुदानित आणि विनाअनुदानित सिलेंडरच्या दरात वाढ करण्यात



आल्यामुळे महागाईने होरपळणाऱ्या सर्वसामान्यांचं किचन बजेट आता आणखी कोलमडणार आहे. २.७१ पैसे अनुदानित सिलेंडरच्या दरात वाढ करण्यात आली आहे. तर ५५.५० पैशांनी विनाअनुदानित सिलेंडरच्या दरात वाढ केली आहे. एलपीजीच्या आंतराष्ट्रीय दरात वाढ आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची झालेल्या घसरणीमुळे ही वाढ करण्यात आली आहे. शनिवारी मध्यरात्रीपासून दिल्लीत अनुदानित सिलेंडरच्या दरात ही दरवाढ लागू होणार आहे.

# महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून राज्यातील ९ महिला कारागृहात सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन

**मुंबई (योगेश होळंब)-** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून राज्यातील विविध महिला कारागृहात असणाऱ्या महिला कैदींकरिता सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन तसेच वापर झालेले पॅड नष्ट करण्याकरिता बर्निंग मशीन देण्यात येत आहे. कारागृहात असणाऱ्या महिलांना सुविधा मिळाव्यात यासाठी हे पाऊल उचलल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून भायखळा कारागृहातील महिला कैदी मंजुळा शेट्ये यांच्या मृत्यू संदर्भात तसेच राज्यातील कारागृहात असणारया महिला कैद्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा, आहार, आरोग्य व सुरक्षितता आणि अनुषंगिक बाबींची चौकशी करण्यासाठी तसेच त्यासंबंधीच्या आवश्यक त्या



उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या विशेष तपास पथक (एघ्ऊ) चा अहवाल राज्य शासनाला सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने महिला कैद्यांना सुविधा मिळावी यासाठी आयोगाकडून राज्यातील ९ महिला कारागृहात सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन आणि वापर झालेले पॅड नष्ट करण्याकरिता बर्निंग मशीन देण्यात येत आहे. वेंडिंग मशीन कारागृहात देताना सोबत ५० नॅपकिन आयोगामार्फत देण्यात येत आहेत. त्यानंतर वेंडिंग मशीन आणि बर्निंग मशीनची सुरक्षा व देखभाल करणे, वेळोवेळी मशीनमध्ये सॅनिटरी पॅड भरणा करण्यासाठी संबंधित कंत्राटदाराशी संपर्क साधणे याची जबाबदारी कारागृह प्रशासनाची असणार आहे. तसेच सॅनिटरी पॅड मोफत देणे किंवा अत्यल्प दरात देण्याबाबतचा निर्णय संबंधित जेल प्रशासनाचा असणार आहे.

